PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ghanchakkar
Year: 1990

Song: Tol Tuza Savar Ga Pori
Lyricist:

ए तोल तुझा सावर गं पोरी
सायकल ही माझी कोरी
ए तोल तूझा सावर ग पोरी
अगं सायकल ही माझी कोरी
नको करूस धडपड
पाय मार भरभर
फिरून ये तू दुनिया सारी

सायकल तुझी जरी कोरी
तरी भ्याव मला वाटतंय भारी
अरे सायकल तुझी जरी कोरी
तरी भ्याव मला वाटतंय भारी
जरा कसून धरना
धरून फिरवना
शिकायची गंमत न्यारी

हात हातात घ्यावा
हं
देवा रं देवा
हात हातात घ्यावा
हं
देवा रं देवा

डौलान चालीव जरा
दुचाकी धन्नाराणी
डौलान चालीव जरा
दुचाकी धन्नाराणी
संगतीनं येईन तुझ्या
कुठबी रानोरानी
अरं
संगतीनं येईन तुझ्या
कुठबी रानोरानी
लई नाजुक प्रेमाची गोरी
अगं तोल तुझा सावरना पोरी
जरा कसून धरना
धरून फिरवना
शिकायची गंमत न्यारी

हात हातात घ्यावा
हां
देवा रं देवा
हात हातात घ्यावा
हं
देवा रं देवा

वाऱ्यानं पदर उडं
कसाबी सावरू आता
हा वाऱ्यानं पदर उडं
कसाबी सावरू आता
इशारा हा करी तुला
फिरून जाता जाता
इशारा हा करी तुला
भिडून जाता जाता
वेग प्रेमाचा वाढलाय भारी
तुझ्या संग मी घेईन भरारी
चल जोशात जाऊया

खुशीत राहूया
बघू दे दुनिया सारी
चल जोशात जाऊया

खुशीत राहूया
बघू दे दुनिया सारी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*